फोन नं.०२२-६९१६२३००
romumbai@dtemaharashtra.gov.in
www.jdteromumbai.org.in

महाराष्ट्र शासन

**सहसंचालक, तंत्र शिक्षण विभागीय कार्यालय, मुंबई**
जागतिक बँक प्रकल्पांतर्गत इमारत, पहिला मजला, शासकीय तंत्र निकेतन परिसर
४९, खेरवाडी, अलियावार जंग मार्ग, वांद्रे (पूर्व), मुंबई ५१

**व्यावसायिक अभ्यासक्रमांसाठी मुला - मुलींना शासनाची योजनेच्या लागू असलेल्या लाभाबाबतची अंमलबजावणी.. शै. वर्ष २०२५-२६**

---

क्रमांक: ३/विकामुं/तंशि/लेखा-३/डीबीटी/२०२५/१८२८ दिनांक :- ०१-०८-२०२५.

प्रति,
अधिष्ठाता/संचालक/प्राचार्य,
सर्व शासकीय, अशासकीय अनुदानित व
खाजगी विनाअनुदानित व्यावसायिक पदविका /
पदवी/पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमांच्या संस्था.

विषय :- तंत्र शिक्षण संचालनालयाचे पत्र क्र. १८/ तंशिसं/डीबीटी/विकाप/२०२५-२६/३८७, दिनांक १६/०७/२०२५

सर्व संबंधित संस्थांनी सोबतच्या तंत्रशिक्षण संचालनालयाचे दि. १६.०७.२०२५ रोजीच्या पत्राचे अवलोकन करावे.

उपरोक्त संदभिर्य पत्रातील शासन निर्णयान्वये, महाराष्ट्र शासनाच्या उच्च व तंत्रशिक्षण विभागाकडून तंत्रशिक्षण संचालनालयाच्या अखत्यारितील शासकीय, शासन अनुदानित (शासकीय अभिमत विद्यापीठासह), कायम विनाअनुदानित (खाजगी अभिमत विद्यापीठे व स्वयंअर्थसहाय्यित विद्यापीठे वगळून) महाविद्यालये /शासकीय विद्यापीठे/ तंत्रनिकेतनामध्ये सुरु असलेल्या निवडक व्यावसायिक अभ्यासक्रमांसाठी सक्षम प्राधिकाऱ्यामार्फत केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियेद्वारे (Centralized Admission Process-CAP) (व्यवस्थापन कोटयातील /संस्था स्तरावरील प्रवेश वगळून ) प्रवेश घेणाऱ्या आर्थिकदृष्टया मागासवर्गीय (EBC), आर्थिकदृष्टया दुर्बल घटक (EWS), सामाजिक व शैक्षणिकदृष्टया मागासवर्गीय (SEBC) विद्यार्थ्यांपैकी, "राजर्षी छत्रपती शाहू महाराज शिक्षण शुल्क शिष्यवृत्ती योजना" अंतर्गत पात्र असलेल्या मुलांना ज्या शैक्षणिक अभ्यासक्रमामध्ये शिक्षण घेत आहेत, त्या अभ्यासक्रमाकरिता आकारण्यात येणारे शिक्षण शुल्क व परीक्षा शुल्क रकमेच्या ५० टक्के लाभ देण्यात येतो.

उपरोक्त संदभिर्य पत्रातील दि. ०८.०७.२०२४ च्या शासन निर्णयान्वये, शैक्षणिक वर्ष २०२४-२५ पासून, पात्र असलेल्या मुलींना ज्या शैक्षणिक अभ्यासक्रमामध्ये शिक्षण घेत आहेत, त्या अभ्यासक्रमाकरिता आकारण्यात येणारे शिक्षण शुल्क व परीक्षा शुल्क रकमेच्या ५० टक्के लाभाऐवजी शिक्षण शुल्क व परीक्षा शुल्क रकमेच्या १०० टक्के लाभ लागू करण्यात आलेला आहे. [इतर मागास वर्ग (OBC) प्रवर्गातील मुलींना इतर बहुजन विकास विभागाकडून लाभ लागू करण्यात आलेला आहे.]

संबंधित संस्थांच्या प्राचार्यांना कळविण्यात येते की, विद्यार्थ्यांना शासनाच्या लागू असलेल्या योजनाबाबत अवगत करावे. संस्थांनी त्यांच्या संस्थेतील सर्व मुलींना ( EBC / EWS/ SEBC / OBC ) दि. ०८.०७.२०२४ च्या शासन निर्णयान्वये,

शासनाकडून दिल्या जाणाऱ्या शिक्षण शुल्क व परीक्षा शुल्क यामध्ये १०० टक्के सवलती बाबत अवगत करावे.अशा पात्र मुलींकडून शिक्षण शुल्क न घेण्याबाबत निर्देशित करावे.

तरी सर्व संस्थांनी शासन योजनांसाठी पात्र असलेल्या संस्थेत शिकणा-या विद्यार्थ्यांकडून डीबीटी पोर्टलवर अर्ज (नवीन/ नुतनीकरण) लवकरात लवकर भरुन घ्यावेत व संस्था स्तरावर प्राप्त झालेले अर्ज प्रलंबित न ठेवता संबंधित योजनेच्या शासन निर्णयातील अटी व शर्तीनुसार काटेकोरपणे तपासणी करुन तात्काळ निकाली (मंजूर/नामंजूर) काढून पुढील कार्यवाहीसाठी पाठवावेत. याबाबत तंत्रशिक्षण संचालनालयाच, म. रा. मुंबई यांनी संदर्भिय पत्रात नमूद केलेल्या १ ते १० अन्वये दिलेल्या निर्देशांचे संस्थांनी काटेकोरपणे पालन करावे.

संदर्भिय पत्रातील निर्देशानुसार सर्व योजनांच्या तक्रारीचे निवारण करण्यासाठी विभागीय कार्यालय स्तरावर संस्थातील "जिल्हा समन्वय अधिकारी" यांची नेमणूक करण्यात आली आहे. "विभागीय समन्वय अधिकारी" यांनी "जिल्हा समन्वय अधिकारी" यांचेसोबत Whats app ग्रुप बनविण्यात यावा व "जिल्हा समन्वय अधिकारी" यांनी "संस्था समन्वय अधिकारी" यांचेसोबत Whats app ग्रुप बनविण्यात यावा

वरील Whats app ग्रुपद्वारे, योजनेसाठी पात्र असलेल्या विद्यार्थ्यांकडून उपरोक्त प्रवर्गाच्या मुलां-मुलींना शासनाकडून अनुज्ञेय असलेल्या शिक्षण शुल्काच्या लाभाची रक्कम भरण्यास सक्ती करणाऱ्या संस्थाबाबतच्या तक्रारी व योजने संबंधित अन्य तक्रारी **"विभागीय समन्वय अधिकारी"** यांनी जिल्हा समन्वय अधिका-यांकडे व **"जिल्हा समन्वय अधिकारी" यांनी संस्था समन्वय अधिकाऱ्यांना** अवगत करावे व तक्रारींबाबतचे निराकरण जलदगतीने करण्यात यावे. जेणेकरुन वरीष्ठ कार्यालयांला तक्रारी प्राप्त होणार नाहीत. याची दक्षता घेण्यात यावी.

आपणांस कळविण्यांत येते की, तक्रारीचे निवारण करण्याकरीता संदर्भिय पत्रातील प्रपत्र-३ अन्वये "संस्था समन्वय अधिकारी" (वर्ग-१ अधिकारी) यांची माहिती सोबतच्या गुगल फॉर्ममध्ये दि.**०४.०८.२०२५** रोजी भरुन सादर करावी.

सर्व संस्थानी खालील नमूद "विभागीय व जिल्हा समन्वय अधिकारी" यांच्या तपशिलाबाबत नोंद घ्यावी.

| "विभागीय समन्वय अधिकारी" यांची माहिती: | | | | प्रपत्र-१ |
|---|---|---|---|---|
| अ.क्र. | नाव | मोबाईल नंबर | कार्यालयीन दूरध्वनी क्र. | कार्यालयीन ईमेल आयडी |
| १ | योगेश बळिराम जामनिक | ७०२०२९७०९६ | २२६९१६२३२४ | dbtromumbai@gmail.com |

| **"जिल्हा समन्वय अधिकारी" यांची माहिती:** | | | | | **प्रपत्र-२** |
|---|---|---|---|---|---|
| अ.क्र. | जिल्हा | नाव | मोबाईल नंबर | कार्यालयीन दूरध्वनी क्र. | कार्यालयीन ईमेल आयडी |
| १ | मुंबई शहर | डॉ. नितीकेत नि . म्हाला | ९२८४७२०१०० | | principal.gpmumbai@dtemaharashtra.gov.in |
| २ | मुंबई उपनगर | | | | |
| ३ | ठाणे | डॉ. दत्तात्रेय रोहिदास महाजन | ७५८८२५८३२१ | | principal.gpthane@dtemaharashtra.gov.in |
| ४ | रायगड | डॉ. महेंद्र चितलांगे | ९४२१६६२९२० | २१४३२९९१८८ | principal.gppen@dtemaharashtra.gov.in |
| ५ | पालघर | डॉ. राजेंद्र उखर्डू चव्हाण | ८२८६३७६४४५ | २५२०२०३१३३ | principal.gpvikramgad@dtemaharashtra.gov.in |
| ६ | रत्नागिरी | डॉ.उदयकुमार वासुदेव पाटील | ९४०३०९०३९५ | | principal.gcoeratnagiri@dtemaharashtra.gov.in |
| ७ | सिन्धुदुर्ग | डॉ. दिलीप मच्छिंद्र घायतिडक | ९८९०८७४३८५ | २३६५२५२२२३ | principal.gpmalvan@dtemaharashtra.gov.in |

(प्रमोद अं. नाईक)
सहसंचालक,
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, मुंबई.

प्रत :- मा. संचालक, तंत्र शिक्षण संचालनालय म. रा. मुंबई यांना माहितीस्तव सविनय सादर.